**वादीतर्फे साक्षीदार क्र. १ मथुराबाई भिकाजी आहेर यांचा शपथेवर ज्यादाचा सरतपास वादीचे विधिज्ञ श्री. एस. एम. सोनवणे यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

१. मी प्रस्तुतकामी पुराव्याचे जे शपथपत्र दिले आहे त्यातील मजकूर माझ्या सांगण्यानुसार लिहिलेला असून तो खरा व बरोबर आहे. मी प्रस्तुतकामी गट नं. २२१/१, गट नं. २२१/२, गट नं. ११९ व गट नं. २२६ च्या ७/१२ उताऱ्यांच्या प्रमाणित प्रती दाखल केलेल्या असून त्यावर संबंधितांची सही व शिक्का आहे. त्यांना अनुक्रमे **निशाणी ३४ ते निशाणी ३७** देण्यात येते. तसेच मी प्रस्तुतकामी मौजे आहेरखेडे शिवारातील फेरफार नोंद क्र. २२५ ची प्रमाणित प्रत दाखल केलेली असून त्यावर संबंधितांचा शिक्का व सही आहे. त्याला **निशाणी ३८** देण्यात येते.

ज्यादाचा सरतपास पूर्ण

**उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते ५, ९, १०, १४ व १६ चे विधिज्ञ श्री. एन. के. आहेर यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

२. माझे काहीही शिक्षण झाले नाही. प्रस्तुतच्या दाव्यातील गट नंबर मला सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, मला दावा मिळकतींचा गट नंबर व प्रत्येकाचे क्षेत्र सांगता येणार नाही. दावा मिळकती या माझ्या वडीलांच्या मालकीच्या होत्या.

३. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. १ हे माझे वडील आहेत, प्रतिवादी क्र. २ ही माझी सावत्र आई आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. ३ हा प्रतिवादी क्र. १ व २ चा मुलगा आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ चा प्रथम विवाह सखुबाईसोबत झालेला होता. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ यांना सखुबाईपासून केवळ एकच मुलगी आहे व ती मी आहे. माझी आई सखुबाई मयत झाली. तेव्हा माझे वय ९ महिन्याचे होते. हे

म्हणणे खरे आहे की, माझी आई सखुबाईच्या मृत्यूनंतर माझ्या वडीलांनी म्हणजेच प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. २ सोबत दुसरे लग्न केले. हे म्हणणे खरे नाही की, माझी सावत्र आई म्हणजेच प्रतिवादी क्र. २ ने माझा चांगल्याप्रकारे सांभाळ केला. हे म्हणणे खरे नाही की, मी उपवर झाल्यावर प्रतिवादी क्र. २ ने माझा विवाह दि.२३.०३.१९७६ रोजी एकुलती एक मुलगी म्हणून थाटामाटात लावून दिला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या लग्नावेळीच मला जे काही द्यायचे होते ते प्रतिवादी क्र. १ व २ ने दिलेले आहे.

४. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या लग्नानंतर मी सासरी राहत असतांना प्रतिवादी क्र. १ ते ३ मला सणाला, माहेरपणासाठी घेऊन येत असत व माझा मानपान करत असत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या लग्नानंतर प्रतिवादी क्र. १ ते ३ कोणत्याही धार्मिक कार्यक्रमासाठी, सणासाठी माझ्याकडे येऊन मला कपडे-लत्ते देत होते व माझा मानपान करत होते.

५. हे म्हणणे खरे आहे की, लग्नानंतर मला जगन ऊर्फ जगदीश हा मुलगा झाला. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ ने माझा मुलगा जगनचा शिक्षणाचा सर्व खर्च केला व त्यामुळेच माझ्या मुलाला नोकरी लागली. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ ने मला ऊसवाड येथे ४ ते ५ बिघा जमिन विकत घेऊन दिली.

६. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ व त्यांच्या भावामध्ये सन १९९६ मध्ये वाटप झाले व त्यानुसार फेरफार नोंद क्र. २०३ झाला. हे म्हणणे खरे आहे की, त्या वाटपामध्ये दावा मिळकती या प्रतिवादी क्र. १ च्या स्वतंत्र वाटणीला आल्या. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ च्या वाटणीला ज्या मिळकती आल्या त्यांचा कायद्याने उपभोग घेण्यास प्रतिवादी क्र. १ ला हक्क व अधिकार आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ ने

त्यांच्या हिश्याला आलेली मिळकत गट नं. १९९ ही वाटपाने प्रतिवादी क्र. ३ ला दिली व त्यानुसार फेरफार नोंद क्र. २२५ झाला.

७. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ३ गट नं. १९९ चा फेरफार नोंद क्र. २२५ अन्वये स्वतंत्र मालक व ताबेदार झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे जावई मोठ्याभाउ शेळके हे काळखोडे ता. चांदवड येथे राहतात. तसेच ते भारतीय सैन्य दलात नोकरीस आहेत. साक्षीदार पुन्हा सांगते की, ते सैन्य दलात नोकरीस होते आता नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझे जावई मोठ्याभाऊ शेळके सुट्टीला आल्यावर ते नेहमी प्रतिवादी क्र. १ ते ३ कडे जात होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्याकडे माझे जावई मोठ्याभाऊ शेळके गेल्यावर ते त्यांचा चांगल्यारितीने मानपान ठेवत होते.

८. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२१मध्ये प्रतिवादी क्र. १ ते ३ ने माझे जावई मोठ्याभाऊ शेळकेचा माझ्या मर्जीप्रमाणे पाहूणचार केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मोठ्याभाऊ शेळकेने प्रतिवादी क्र. १ ते ३ सोबत भांडण तंटा केला व आता तुम्हाला दाखवून देतो असे म्हणून निघून गेला. हे म्हणणे खरे नाही की, मोठ्याभाऊ शेळकेने माझा मुलगा जगदीशचे प्रतिवादी क्र. १ ते ३ विरुद्ध कान भरले व आम्ही संगनमत करुन प्रतिवादींविरुद्ध सदरचा खोटा दावा दाखल केला.

९. हे म्हणणे खरे नाही की, माझे लग्न सन १९७६ मध्ये झाल्यामुळे मला कायद्याने माझ्या वडीलांच्या मिळकतीमध्ये कोणताही हिस्सा मिळत नाही. हे म्हणणे खरे आहे की, फेरफार नोंद क्र. २२५ मी आजतागायत आव्हानित केलेला नाही तसेच तो रद्दबातल होण्यासाठी कोणताही दावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या जावयाशी व मुलाशी संगनमत करुन प्रतिवादींना केवळ त्रास देण्यासाठी सदरचा खोटा दावा दाखल

केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील सर्व मजकूर हा खोटा व चुकीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुतकामी प्रतिवादींनी जी कैफियत दिलेली आहे ती बरोबर आहे.

**उलटतपास पूर्ण**

श्रवणोत्तर स्विकृत,

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.03.13 16:21:17 +0530

दि. १३.०३.२०२६.

चांदवड

(वृषाली दी. सुंगारे)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
चांदवड.